**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 02.09.2025** **वार- मंगळवार**

---

**<u>जाहिरात</u>**

पुणे महापालिकेकडून शहरातील महत्त्वाच्या जागांवर जाहिराती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शहरातील महापालिकेचे उड्डाणपूल, पथदिवे, रस्त्यावरील फर्निचर, उड्डाणपुलांचे खांब, पादचारी पुलांवर अनधिकृतपणे जाहिराती केल्या जात आहेत. त्यामुळं शहर विद्रुप होण्याबरोबरच महापालिकेचंही आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळं महापालिकेकडूनच आता या जागेवर जाहिराती केल्या जाणार आहेत. त्यासाठी महापालिकेनं जागा निश्चित केल्या आहेत.

**<u>कोंडी</u>**

पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड पुणे यांच्यामार्फत मेट्रो विस्तारीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. त्यानुसार शहरातील मेट्रो

विस्तारीकरणात भक्ती शक्ती चौक – मुकाई चौक, किवळे – भुजबळ चौक, वाकड साई चौक, जगताप डेअरी – कोकणे चौक, नाशिक फाटा – संत तुकाराम नगर चौक, गवळी माथा चौक, भोसरी डिस्ट्रीक सेंटर, गोडाऊन चौक – चाकण या महत्त्वाच्या मार्गांचा समावेश आहे. या बैठकीत भोसरीतील सध्याचा उड्डाणपूल अडथळा ठरत असेल तर तो काढून घ्यावा आणि गोडाऊन चौक ते चाकण या मार्गाप्रमाणंच एकसारखी रचना नाशिकफाटा ते चाकणपर्यंत करावी आणि त्याची तांत्रिक पडताळणी 8 दिवसात करावी. तसंच भुजबळ चौक वाकड इथल्या दोन्ही मेट्रो मार्गांची रचना प्रवाशांना सोईस्कर असावी, मेट्रो स्टेशनच्या जवळपास पार्किंग व्यवस्था करण्यात यावी आदी सूचनांवर चर्चा करण्यात आली.

**<u>विसर्जन</u>**

सात दिवसांच्या गणपतींसोबत आज माहेरवाशीण गौरींनाही निरोप देण्यात येत आहे. तत्पूर्वी त्यांना पुरणावरणाचा नैवेद्य देण्यात आला.

जल कुंभात गणेशाचं विसर्जन करुन, न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेमध्ये गेले सात दिवस सुरू असलेल्या वीर गणेशोत्सवाची सांगता आज झाली. रमणबाग ढोल ताशा पथकाच्या स्थिर वादनात, प्रशालेचे माजी विद्यार्थी प्रदीप शुक्ल यांच्या हस्ते गणेश मूर्तींचं पर्यावरणपूरक विसर्जन करण्यात

आलं. गणेशोत्सवा दरम्यान झालेल्या आठ स्पर्धांमधील 110 विजेत्यांना आणि सहा संघांना माजी मुख्याध्यापिका चारुता प्रभूदेसाई यांच्या हस्ते बक्षिसं वितरित करण्यात आली.

**<u>बीजगोळे</u>**

पुण्यातील पूर्व भागातील कस्तुरे चौक गणेशोत्सव मंडळानं वेगळा उपक्रम राबवत गणपती बघायला येणाऱ्या भाविकांना प्रसादासोबत देशी झाडांचे बीज गोळे दिले. यासोबतच देशी झाडांच्या बिया देखील वाटण्यात आल्या. कार्यकर्त्यांनी देशी झाडांचं रोपण आणि संवर्धनाचा संकल्प करत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनाही त्याचं महत्त्व पटवून दिलं. मंडळातर्फे 1 हजारहून अधिक बीज गोळे आणि देशी झाडांच्या बिया गणेश भक्तांना देण्यात आल्या आहेत. सध्या देशी झाडांचं प्रमाण कमी होत चाललं आहे. शोभेची झाडं लावली जातात; पण पिंपळ, वड, आंबा, बाभूळ, कडुलिंब, चिंच यांसारखी उपयुक्त देशी झाडं सहसा कोणी लावत नाही. ही झाडं केवळ सावली, ऑक्सिजन आणि औषधी गुणधर्मासाठीच नव्हे तर पक्षी आणि प्राण्यांसाठीही उपयुक्त ठरतात असं मंडळाचे अध्यक्ष राजेश होनराव यांनी सांगितलं.

**<u>वैद्यकीय</u>**

पुणे गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये आपत्कालीन स्थिती उद्भवल्यास तातडीनं वैद्यकीय उपचार उपलब्ध होणार आहेत. विसर्जन मिरवणुकीत दोन ठिकाणी रुग्णवाहिकांसह वैद्यकीय पथकं तैनात केली जाणार आहेत. बेलबाग चौक, टिळक चौक, स.प. महाविद्यालय, पुरम चौक, गोखले हॉल, लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, केळकर रस्ता या ठिकाणी आपत्कालीन वैद्यकीय मदत पथक असेल. मॉडर्न विकास संस्थेतर्फे लक्ष्मी रस्त्यावरील विजय टॉकीज चौकात वैद्यकीय सेवा दिली जाईल. महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे अतिदक्षता विभाग 24 तास सुरू आहे. ही सुविधा विसर्जन मिरवणुकीच्या काळातही सुरू राहणार असल्याचं पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागानं सांगितलं आहे.

**<u>मूर्ती</u>**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि स्वराज्य महाराष्ट्र या संस्थेच्या वतीनं मूर्तीदानाविषयी जनजागृती करण्यात येत आहे. या अंतर्गत चिंचवडगाव परिसरात आज दुपारपर्यंत 1 हजार 176  गणेश मूर्तींचं दान तर चार टन निर्माल्य स्वीकारण्यात आलं. याच धर्तीवर आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये पथकं तयार करण्यात आली असून प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती दान करण्याविषयी नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे. घाटांवर या उपक्रमाची माहिती देणारे फलक देखील लावण्यात आले आहेत. घरच्या घरी या गणरायाचं विसर्जन करत आहेत त्या भाविकांनीही याविषयीची नोंद

महापालिकेच्या संकेतस्थळावर करावी असं आवाहन  करण्यात येत आहे. महापालिकेच्या 33 घाटांवर निर्माल्य कुंड ठेवण्यात आले आहेत. या सर्व निर्माल्याचा खत प्रक्रियेसाठी वापर करण्यात येणार आहे.

**बारणे**

पिंपरी - जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील देहूरोड इथल्या सेंट्रल चौक आणि मुंबई-बंगळुरू महामार्गावरील देहूरोड-कात्रज बाह्यवळण मार्गावरील किवळे समीर लॉन्स, ताथवडे, पुनावळे चौक, वाकड, भूमकर वस्ती या रस्त्याची मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी आज अधिकाऱ्यांसह पाहणी केली. सेवा रस्त्यावरील खड्डे तातडीनं बुजविण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. किवळे ते बालेवाडी स्टेडियमपर्यंत 8 पूर्णांक 3 किलोमीटर अंतरावर उन्नत मार्गाची निर्मिती करण्यात येणार आहे. या साडेपाच हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावाला महिन्याभरात मान्यता मिळेल, असंही त्यांनी सांगितलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**